# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.10.2025** **वार:मंगळवार**

---

## सर्वप्रथम, आकाशवाणीच्या सर्व श्रोत्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

1. आयएनएस विक्रांत ही पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका म्हणजे भारताची कल्पकता, निर्धार आणि जागतिक प्रभावाचं प्रतीक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. विकसित भारत 2047 च्या स्वप्नपूर्तीसाठी राज्याचं व्हिजन डॉक्युमेंट सहाय्यकारी ठरेल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
3. आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली प्रभावीपणे करण्याच्या उद्देशाने राज्यात 'वॉर रूम' स्थापन होणार
4. राज्यात सर्वत्र दीपावलीचा उत्साह; लक्ष्मीपूजनानिमित्त आज दुपारी शेअर बाजारात मुहूर्ताचे सौदे
5. माजी मंत्री महादेव शिवणकर यांच्या पार्थिव देहावर आज होणार अंत्यसंस्कार आणि
6. ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक असरानी यांचं निधन

**<u>पंतप्रधान-दिवाळी</u>**

सैन्याच्या तिनही दलांमधल्या अचूक समन्वयामुळे ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सैनिकांबरोबर दिवाळी साजरी करण्याची आपली प्रथा कायम ठेवत काल पंतप्रधानांनी गोवा आणि कारवार किनारपट्टीजवळच्या आयएनएस विक्रांत या युद्धनौकेवर दिवाळी साजरी केली. त्यावेळी ते बोलत होते. आयएनएस विक्रांत ही स्वदेशी बनावटीची पहिली विमानवाहू युद्धनौका म्हणजे भारताच्या कल्पकतेचं, निर्धाराचं आणि जागतिक प्रभावाचं प्रतीक आहे असं सांगून पंतप्रधान म्हणाले.....

**जिस दिन देश को स्वदेशी आईएनएस विक्रांत मिला था, उसी दिन भारतीय नौसेना ने गुलामी के एक बड़े प्रतीक चिन्ह का त्याग कर दिया था। हमारी नेवी ने छत्रपति शिवाजी महाराज की प्रेरणा से नया ध्वज अपनाया था। छत्रपति शिवाजी महाराज की हमारा आईएनएस विक्रांत आज आत्मनिर्भर भारत और मेड इन इंडिया का बहुत बड़ा प्रतीक है। विक्रांत विशाल है, विराट है, विहंगम है, विक्रांत विशिष्ट है, विक्रांत विशेष भी है। विक्रांत केवल एक युद्धपोत नहीं है। ये इक्कीस वीं सदी के भारत के परिश्रम, प्रतिभा, प्रभाव और प्रतिबद्धता का प्रमाण है।**

पंतप्रधानांनी आपल्या भाषणातून देशवासियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या......

**समुद्र की गहरी रात और सुबह का सूर्योदय मेरी दिवाली कई मायनों में खास बन गई है। आईएनएस विक्रांत की इस वीरभूमि से कोटिकोटि देशवासियों को भी दीपावली की बहुतबहुत शुभकामनाएं।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांची नवी दिल्लीत भेट घेऊन त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

**व्हिजन डॉक्युमेंट**

विकसित भारत 2047 च्या स्वप्नपूर्तीसाठी राज्याचे व्हिजन डॉक्युमेंट सहाय्यकारी ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. विकसित महाराष्ट्र 2047 सल्लागार समितीच्या बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. विकसित महाराष्ट्र 2047 च्या मसुद्याला सल्लागार समितीनं या बैठकीत मान्यता दिली. मंत्री मंगलप्रभात लोढा, पंकजा मुंडे, नितेश राणे या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित होते तर मंत्री दादाजी भुसे आणि शिवेंद्रसिंह राजे भोसले बैठकीत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. विकसित महाराष्ट्राचा मसुदा हा ऐतिहासिक दस्तऐवज असून भविष्यात कुठलीही योजना, धोरणं आखताना या मसुद्याचा उपयोग झाला पाहिजे. हे डॉक्युमेंट महाराष्ट्राला इतर राज्यांसोबत नाही, तर जगासोबत स्पर्धा करण्यात सक्षम बनवेल असं फडणवीस यावेळी म्हणाले.

**आरोग्य योजना**

विविध आरोग्य योजनांचा समन्वय साधणे, दुहेरी लाभ टाळणे आणि सर्व आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली प्रभावीपणे करणे या उद्देशाने राज्यात 'वॉर रूम' स्थापन करण्यात येत आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन अर्थात मित्रा या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी याचे अध्यक्ष असतील. सर्व अर्ज, शंका आणि तक्रारींचं निवारण या वॉर रूमच्या माध्यमातून केलं जाणार असून, त्यावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचं थेट नियंत्रण असेल. काही प्रकरणांमध्ये एकाच रुग्णानं दोन किंवा अधिक योजनांचा लाभ घेतल्याची नोंद झाल्यामुळ शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी आणि योजनांची समन्वित अंमलबजावणी करण्यासाठी ही वॉर रूम स्थापन करण्यात येणार आहे.

**दिवाळी**

समृद्धी आणि मांगल्याचा सण असलेल्या दीपावलीचा राज्यात सर्वत्र उत्साह आहे. आज संध्याकाळी घरोघरी तसंच दुकानांमध्ये आणि व्यापारी आस्थापनांमध्ये लक्ष्मीपूजनाचा उत्साह असेल. लक्ष्मीपूजनानिमित्त मुंबईच्या शेअर बाजारांमधे आज दुपारी पावणे दोन ते पावणेतीन या वेळात मुहूर्ताचे सौदे होणार आहेत. दरम्यान दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजारांमध्येही काल तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स 411 अंकांची वाढ नोंदवत काल 84 हजार 363 अंकांवर बंद झाला.

दिवाळीच्या निमित्तानं राज्यात सर्वत्र दिवाळी पहाटसारख्या सांगीतिक कार्यक्रमांचं आणि सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. पुण्यात झालेल्या सांगितीक कार्यक्रमात पंडित भीमसेन जोशी यांचे बुलंद स्वर, लता मंगेशकरांचे मधुर स्वर यांच्या आठवणी जागवण्यात आल्या तसंच अटल बिहारी वाजपेयी यांच्या कविताही सादर करण्यात आल्या. दिवाळीच्या सुट्टीत घरी जाऊ न शकलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं काल दिवाळी फराळाचं आयोजन केलं होतं. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक रविंद्र कुलकर्णी आणि अन्य अधिकाऱ्यांनी दिवाळीनिमित्त वसतिगृहात राहणाऱ्या इतर राज्यांमधल्या विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधला आणि त्यांना फराळ दिला.

सातारा जिल्ह्यात सज्जनगडावर मशाल महोत्सव आयोजित करण्यात आला होता. पहाटे चार वाजताच भातखळे इथल्या वाहनतळापासून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. हलगी, ढोल-ताशांच्या गजरात, शंख निनादात आणि फुलांच्या वर्षावात निघालेल्या पालखीचा मार्ग आकर्षक रांगोळ्यांनी सजवला होता. यावेळी सज्जनगड शेकडो मशालींच्या प्रकाशात उजळून निघाला होता. पालखी गडावर आल्यानंतर साहसी खेळ आणि पोवाड्यांचा कार्यक्रम झाला.

कोल्हापूरातील बालकल्याण संकुल, अंधशाळा आणि कळंबा कारागृहात काल सामाजिक भान जपत दिवाळी साजरी करण्यात आली. विविध सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी याठिकाणी जाऊन फराळाचं वाटप केलं. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीमध्ये विविध देशांच्या दूतावासांमध्येही काल दिवाळी साजरी करण्यात आली. नृत्य, संगीताच्या कार्यक्रमाबरोबरच या दूतावासांमधील कर्मचाऱ्यांनी स्नेहभोजनाचाही आस्वाद घेतला.

## स्मारक अनावरण

निःस्वार्थ भावनेनं समाजाच्या सुरक्षेसाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या पोलीस बांधवांचं शौर्य, त्याग आणि सेवाभाव हीच त्यांच्या कर्तृत्वाची खरी ओळख आहे असं नंदूरबार जिल्ह्याचे पालकमंत्री माणिकराव कोकाटे काल म्हणाले. नंदुरबार इथं उभारण्यात आलेल्या पोलीस शहीद स्मारकाचं अनावरण कोकाटे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पोलिसांच्या कार्याची स्मृती जिवंत ठेवण्यासाठी हे स्मारक उभारलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

## पूरग्रस्त निधी-हिंगोली

हिंगोली जिल्ह्यात अतीवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्याचं काम वेगानं सुरू आहे. थेट लाभ हस्तांतरणाद्वारे 178 कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याला मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत 1 लाख 82 हजार 498 शेतकऱ्यांच्या खात्यावर 141 कोटी 15 लाख 3 हजार 339 रुपये अनुदान जमा करण्यात आलं असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. ॲग्रीस्टॅक नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी नोंदणी करुन घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं आहे.

## शेतमाल-सांगली

शेतकऱ्यांच्या मालाला चांगली बाजारपेठ मिळावी आणि त्यांना चांगलं उत्पन्न मिळावं, या हेतूनं सांगली जिल्ह्यात एक संकल्पना राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत सांगली जिल्ह्यातले 25 टन पेरू, टोमॅटो आणि दहा हजार अंडी दिल्लीला पाठवण्यासाठी दर्शन एक्सप्रेस या रेल्वेगाडीला एक विशेष वॅगन पहिल्यांदाच जोडण्यात आली. सुरुवातीला प्रायोगिक तत्वावर फळं, भाजीपाला पाठवला असून पुढील काळात बाजार मागणीनुसार दररोज किंवा आठवड्यातून एकदा रेल्वेनं शेतमाल पाठवण्याबाबत नियोजन केलं जाणार असल्याचं यावेळी अधिकाऱ्यांनी सांगीतलं.

## आरोग्य संमेलन

रुग्ण हक्क परिषद आणि पुणे महानगरपालिकेनं विविध संस्थांच्या सहकार्यानं पहिल्या आरोग्य साहित्य संमेलनाचं आयोजन पुण्यात नुकतंच केलं होतं. या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. स्मिता आणि डॉ. रवींद्र कोल्हे यांना पहिला 'महाराष्ट्र आरोग्य भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

## निधन

राज्याचे माजी अर्थमंत्री महादेवराव शिवणकर यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. शिवणकर गडचिरोली जिल्ह्यातल्या आमगाव मतदारसंघातून पाच वेळा आमदार तर चिमूरमधून खासदार म्हणून निवडून आले होते. त्यांनी युतीच्या पहिल्या मंत्रीमंडळात जलसंपदा मंत्री आणि अर्थमंत्री म्हणून काम केलं होतं. गोंदिया जिल्हा निर्मितीत त्यांचं महत्त्वाचं योगदान होतं. त्यांच्या पार्थिवावर आज आमगावातल्या साकरीटोला घाटावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

## असरानी निधन

हिंदी चित्रपट सृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते असरानी यांचं काल दीर्घ आजारानं निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. जवळपास पाच दशकांच्या आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये विनोदी भूमिका केल्या. शोलेमधल्या जेलरची त्यांची भूमिका विशेष गाजली. चुपके चुपके, नौकर ते अगदी अलिकडचा बंटी और बबली 2 असा त्यांचा प्रदीर्घ अभिनय प्रवास आहे. चला मुरारी हिरो बनने, सलाम मेमसाब, दिल ही तो है, हम नही सुधरेंगे या चित्रपटांचं दिग्दर्शनही असरानी यांनी केलं होतं.

## हवामान

राज्यात आज तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**